
फुले-शाहू आंबेडकर
विचारांची प्रासंगिकता
संपादक -
डॉ. मनिष सोनवणे
उपसंपादक -
डॉ. सी.डी. राजपूत
प्रा. उद्धव कुडासे
प्रा. अजय अहिर

अथर्व पब्लिकेशन्स

# फुले-शाहू-आंबेडकर विचारांची प्रासंगिकता

© सुरक्षित

ISBN : 978-93-91712-88-4
पुस्तक प्रकाशन क्र. ९११

**प्रकाशक व मुद्रक**
युवराज भटू माळी

**अथर्व पब्लिकेशन्स**
**धुळे :** १७, देविदास कॉलनी, वरखेडी रोड, धुळे- ४२४ ००१.
**संपर्क :** ९४०५२०६२३०
**जळगाव :** शॉप नं. २, नक्षत्र अपार्टमेंट, शाहूनगर हौसिंग सोसायटी,
तेली समाज मंगल कार्यालयासमोर, जळगाव- ४२५ ००१.
**संपर्क :** ०२५७-२२३९६६६, ९७६४६९४७९७
**ई-मेल :** atharvapublications@gmail.com
**वेबसाइट :** www.atharvapublications.com

**प्रथमावृत्ती :** १९ फेब्रुवारी २०२२
**अक्षरजुळवणी :** अथर्व पब्लिकेशन्स
**मूल्य :** ७००

**E-Book *available on***
**amazon.in ▪ GooglePlayBooks ▪ atharvapublications.com**

**ऑनलाइन पुस्तक खरेदीसाठी www.atharvapublications.com**

या पुस्तकातील कोणत्याही भागाचे पुनर्निर्माण अथवा वापर इलेक्ट्रॉनिक अथवा यांत्रिकी साधनांनी - फोटोकॉपिंग, रेकॉर्डिंग किंवा कोणत्याही प्रकारे माहिती साठवणुकीच्या तंत्रज्ञानातून प्रकाशकाच्या व लेखकाच्या लेखी परवानगीशिवाय करता येणार नाही. सर्व हक्क राखून ठेवले आहेत.

## अनुक्रमणिका

१ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे वृत्तपत्रातून
प्रेरित झालेले शिक्षणविषयक दृष्टिकोन ....................२१
- अविनाश कैलास पवार

२ दलित ऐक्य का होत नाही? ....................२९
- डॉ. प्रकाश मारुती पवार

३ महात्मा फुले : महाराष्ट्रातील पुरोगामी समाजसुधारक ....................३४
- डॉ. सी. डी. राजपूत

४ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची मशाल
खेडोपाडी पोहोचविणारा लोकशाहीर-अण्णा भाऊ साठे ....................३८
- डॉ. अर्जुन गंगाराम नेरकर

५ डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि कामगार चळवळ....................४३
- प्रा. अजय एकनाथ अहीर

६ सावित्रीबाई : एक समाज प्रबोधनकार ....................५०
- डॉ. मीनाक्षी पाटील

७ राजर्षी शाहू महाराज : एक 'सर्वांगपूर्ण राष्ट्रपुरुष'....................५५
- प्रा. अशोक भावराव वाघचौरे

८ राजर्षी शाहू महाराज : एक आदर्श राज्यकर्ता ....................६१
- डॉ. स्नेहल संजय मराठे

९ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक तत्त्वज्ञान....................६६
- प्रा. उदय खंडू टेके

१० डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या राज्य समाजवादी
विचारांची प्रासंगिकता ....................७४
- प्रा. प्रदीप उत्तम वेताळ

- *अजय एकनाथ अहिर*
सहयोगी प्राध्यापक, इतिहास विभाग,
महाराजा सयाजीराव गायकवाड महाविद्यालय,
मालेगाव कॅम्प, मालेगाव

डॉ. बाबासाहेबांनी आपल्या सार्वजनिक कार्याची सुरुवात केल्यापासून ते कामगार चळवळीशी जोडले गेले होते. ते ज्या भागात राहायचे तो भाग कामगार चळवळीचे केंद्र होता. परळ भागातूनच कामगार चळवळीची सुरुवात झाली होती. डॉ. बाबासाहेबांनी केवळ दलित कामगारांनाच नव्हे; तर इतर सर्व समाजांतील दुर्बल कामगारांच्या अन्यायाला वाचा फोडण्याचे काम केले. भारतातील भांडवलशाहीचा विचार करता आधुनिक उद्योगधंदे, खाणी, दळणवळणाच्या सोयी आणि मळे यांच्या विकासामुळे एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात भारतीय समाजात औद्योगिक कामगार वर्गाच्या रूपाने एक नवा वर्ग निर्माण झाला. इ. स. १८८०-८१ पर्यंत हा वर्ग साधारण होता. या वर्षी कापड गिरण्यांमध्ये ४७,९५५, ज्यूट मिलमध्ये ३५,२३५ आणि कोळशाच्या खाणीत ११९६९ कामगार कार्यरत होते. इ. स. १९०५-०६ पर्यंत या नव्या कामगार वर्गाचा स्वतंत्रपणे विस्तार झाला होता. (बिपीन, २००४: ४५) रेल्वेची सुरुवात ही भारतातल्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या प्रवेशाची घोषणा होती. इ. स. १८५० च्या दरम्यान भारतात सूती कापड उद्योग, ज्यूट उद्योग, कोळसा खाणी हे उद्योग स्थापन झाले होते. ज्यूट उद्योग आणि कोळसा खाण उद्योग यामध्ये युरोपियन भांडवल मोठ्या प्रमाणात होते, तर भारतीयांचे भांडवल व उद्योगशीलतेचे केंद्र सूती कापड उद्योग होते. यामुळेच सुरुवातीपासूनच सूती कापड उद्योगाला भारताच्या औद्योगिकीकरणात महत्त्वपूर्ण स्थान प्राप्त झाले. इ. स. १८७९ मध्ये देशात ५६ सूती कापड गिरण्या होत्या. त्यामध्ये ४३००० कामगार काम करीत होते. त्यातील ७५% कारखाने मुंबई प्रांतात स्थापन झाले होते. इ. स. १८८० पर्यंत भारतीय औद्योगिकीकरणाचा वेग जरी कमी असला, तरी भारतीय नेत्यांचे व उद्योजकांचे लक्ष या औद्योगिकीकरणाने वेधून घेतले (बिपीन, २००४ : ४५). भारतात हे औद्योगिकीकरण होत असताना आणि त्यामध्ये नवा कामगार वर्ग निर्माण होत असताना भारतीय परंपरागत समाजव्यवस्थेची वैशिष्ट्ये ही कायम

राहिलेली दिसतात. भारतातील मार्क्सवाद्यांनी भारतात उदयाला आलेल्या वर्गीय समाजवास्तूच्या पायाचा भाग मानून जातीला इमल्याचा भाग ठरविले आणि भांडवलशाहीच्या वाढत्या विस्ताराबरोबर जाती संस्था व अस्पृश्यता आपोआप नष्ट होणार असल्याचा निष्कर्ष जाहीर केला (बगाडे, २०२० : ५४-५५). भारतीय मार्क्सवाद्यांचे हे आकलन डॉ. बाबासाहेबांना अमान्य होते. भारतातला श्रमिक जाती-जातींमध्ये विभागला गेला आहे त्याला एक होण्यासाठी जातीची जाणीव सोडणे आवश्यक आहे; पण भारतातला श्रमिक- शोषित स्वतःची जात गमावायला तयार नसल्यामुळे भारतातील क्रांतीचे गाडे जाती जाणिवेच्या चिखलात रुतून बसले आहे, असा अभिप्राय बाबासाहेब देतात (बगाडे, २०२० : ५५). डॉ. बाबासाहेबांच्या मते, श्रमाकडे व श्रमसंबंधांकडे पाहण्याची वेगळी दृष्टी भांडवलशाहीत अस्तित्वात असते. उत्पादक, अनुत्पादक, कुशल-अकुशल, बौद्धिक, शारीरिक अशा विविध प्रकारे श्रमाची वर्गवारी त्यात करण्यात येते. भांडवली वर्ग व्यवस्थेचा हा विचार डॉ. बाबासाहेबांनी जातिव्यवस्थेच्या आर्थिक विश्लेषणाचा तत्त्वाधार बनवला (बगाडे, २०२० : ३६). भांडवली वर्गव्यवस्थेत दलितांना आत्मोन्नातीची संधी उपलब्ध होते. मात्र, महार वतनाच्या व्यवस्थेत गढलेल्या दास्यत्वाच्या श्रमसंबंधामुळे दलितांना ती नसते, म्हणून दर्जावर आधारलेले जातिव्यवस्थेचे श्रमदास्य सोडून भांडवली वर्ग व्यवस्थेच्या करारसंबंधात दलितांनी प्रवेश केला पाहिजे, असा आंबेडकरांचा युक्तिवाद होता. (बगाडे, २०२० : ३६) डॉ. बाबासाहेबांना कम्युनिस्टांची जातीच्या आकलनाबाबतची भूमिका जरी मान्य नसली, तरी १५ जानेवारी १९३८ च्या जनता साप्ताहिक वृत्तपत्रात ते म्हणतात, श्रमिकांच्या संघर्षाच्या संदर्भात कम्युनिस्ट विचारप्रणाली ही आम्हाला सर्वाधिक जवळची आहे. (ओम्वेट, २०२१ : ७७)

भारतातला भांडवलदार वर्ग हा उच्च जातीतून आलेला होता, तर कामगार वर्ग हा निम्नतर जातीतून आलेला होता. वर्गीय समाजरचनेमध्ये शोषक आणि शोषित असा भेद हा आर्थिक स्तरावर असतो. परंतु जाती आधारित समाजरचनेमध्ये हा भेद जाती आधारित असतो. भांडवली समाजरचना ही वर्गीय आणि ब्राह्मणी समाजरचना ही जातीय स्तरांवर शोषण करणारी संस्था असल्यामुळे डॉ. बाबासाहेबांनी भांडवलशाही आणि ब्राह्मणशाही यांना शत्रू मानले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या जीवनकार्यात शोषित, पीडित समाजापैकी केवळ पददलित समाजासाठी कार्य केले नाही, तर भांडवलदारांच्या वेठबिगारीत अडकलेल्या उपेक्षित कामगार-श्रमिक यांच्यासाठीसुद्धा लढा उभारला होता. कामगार वर्ग हा प्रथमदर्शनी वरवर जरी एकसंध वर्ग दिसत असला तरी आतून तो जातीय मानसिकतेने पोखरला गेला होता.

कामगारांवर होणाऱ्या अन्यायाविरोधात वाचा फोडण्याचे काम भांडवलधार्जिण्या कामगार संघटनांनी नाकारले होते. डॉ. बाबासाहेबांनी केवळ दलित नव्हे; तर सर्वच समाजातील शोषित कामगारांच्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी इ. स. १९३६ मध्ये 'स्वतंत्र मजूर पक्षा'ची स्थापना केली.

**डॉ. बाबासाहेबांचे कामगारविषयक धोरण –** डॉ. बाबासाहेब स्वतंत्र मजूर पक्षाचे अध्यक्ष असताना त्यांनी सर्वच शोषित वर्गासाठी जे कार्य केले, त्यावरून त्यांचे कामगारविषयक धोरण स्पष्ट होते. त्यांनी स्वतंत्र मजूर पक्षाचे धोरण ठरविताना खालील गोष्टींवर भर दिला –

१) कामगारांच्या मजुरीची किमान मर्यादा ठरवून देणे.
२) कामगारांच्या कामाचे तास कमी करणे.
३) गिरण्या व कारखान्यातील कामगारांच्या नोकरीची शाश्वती, बढती यासंबंधी थेट कायदेशीर तरतूद करणे.
४) कामाचे योग्य वेतन.
५) भरपगारी रजा, आजारी रजा, वृद्धत्वाचे पेन्शन, अपघाती नुकसान भरपाई.
६) कामगारांसाठी स्वस्त घरे.
७) कामगारांच्या आरोग्याची काळजी घेणे.
८) कामगारांच्या बालकांसाठी शिक्षणाची सोय करणे.

वरील तरतुदींचा विचार करता लक्षात येते की, डॉ. बाबासाहेबांनी कामगारांच्या व्यापक हिताचा विचार केलेला दिसतो. भांडवलदारांनी कामगारांचे ज्या माध्यमातून आणि ज्या प्रकारे शोषण केले होते, ते सर्व डॉ. बाबासाहेबांनी कायद्याच्या कक्षेत आणण्याचा प्रयत्न केला होता. स्वतंत्र मजूर पक्षात सर्वच शोषित, दुर्बल आणि बहुजन समाजघटकांचा समावेश होता. 'गरिबांचा पक्ष गरिबांनीच चालविला पाहिजे' अशी डॉ. बाबासाहेबांची भूमिका होती. (बसाखेत्रे र., २०१७ : ५९३)

इ. स. १९२७ मध्ये जेव्हा मुंबई विधिमंडळाच्या सदस्यांच्या नोंदवहीत नोंद करावयास त्यांचे विवरण मागविण्यात आले, तेव्हा त्यांनी राजकीय विचारसरणी 'स्वतंत्र कामगारवादी 'अशी दर्शविली. (गायकवाड, २००७ : ६) २४ नोव्हेंबर १९३० च्या 'जनता' या पाक्षिकात डॉ. बाबासाहेब लिहितात, अस्पृश्यतेच्या रूढीमुळे आपली खेडी सोडून शहरात आलेल्या अस्पृश्यांचा शहरात कसा कोंडमारा होतो हे डॉ. बाबासाहेब दाखवून देतात. अस्पृश्य कामगारांना गिरण्यांच्या कपडा खात्यात प्रवेश मिळत नाही, त्यांच्यापैकी कोणाला जॉबर, मुकादम अथवा कोणत्याही मोठ्या पगारावर घेतले जात नाही, अशी परिस्थिती जगभर उसळलेल्या

कामगार चळवळीच्या ऐन भरभराटीच्या वेळेस हिंदुस्थानात आहे. (डोळस, २०१८ : ५) मुंबईमध्ये प्रजेच्या खर्चातून बांधल्या गेलेल्या डेव्हलपमेंट, इम्प्रूव्हमेंट व म्युनिसिपालिटी यांच्या चाळीतही ठिकठिकाणी महारवाडे, चांभारवाडे, मांगवाडे व भंगीवाडे निर्माण झालेले आहेत. सार्वजनिक पैशातून बांधलेल्या इमारतीत जर अशा प्रकारे जातिभेद होत असेल, तर खाजगी घरांबद्दल विचारच करायला नको. (डोळस, २०१८ : ५) मद्रासमध्ये मोची कामगार अस्पृश्य असले. आणि त्यांची आर्थिक परिस्थिती स्पृश्य कामगारांच्या बरोबरीची असली तरीदेखील एकाच वर्गाचे असतानाही त्यांना राहण्यास जागा मिळत नाही. ज्या देशामध्ये समान आर्थिक परिस्थिती असूनही व जेथे भांडवलशाही व साम्राज्यशाही यांच्या वरवंट्याखाली सारखाच रगडला जात असलेला श्रमजीवी कामगार वर्ग फक्त अस्पृश्यतेच्या रूढीमुळे एकत्र येऊ शकत नाही. जेथे आर्थिक परिस्थितीपेक्षाही धर्माच्या नावाखाली उत्पन्न केलेल्या भयंकर जातिभेदाचेच प्राबल्य जास्त आहे, तेथे त्या पद्धतीवरच प्रथमतः व प्रामुख्याने हल्ला करणे आवश्यक आहे. जगातील इतर देशात हा विशिष्ट जातिभेद नसल्यामुळे तेथे स्पष्टपणे दोन आर्थिक वर्ग निर्माण होऊ शकतात. परंतु हिंदुस्थानात जातिभेदामुळे स्पष्टपणे दोन आर्थिक वर्ग पडण्यास अवकाश आहे. (डोळस, २०१८ : ६) कामगारांमध्ये असणाऱ्या जात जाणिवा या त्यांच्यातील वर्गीय जाणिवेला मारक होत्या, वर्ग जाणीव असलेल्या कामगाराला देखील या जातिभेदरूपी अत्यंत कडव्या साम्राज्यशाहीची स्पष्टपणे कल्पना होत नाही, आर्थिक परिस्थिती बदलली तरीदेखील जातिभेद नष्ट होतील याबाबत ऐतिहासिक पुरावा उपलब्ध नाही. डॉ. बाबासाहेबांनी भारतातील हा वर्गजाती संबंधांचा पेच उलगडून दाखवला आणि सर्व कामगारांमध्ये वर्गीय जाणीव निर्माण होण्यासाठी अस्पृश्य कामगारांना इतर कामगारांचे हक्क मिळवून देणे आपले कार्य मानले. यामुळे कामगार हा एक वर्ग म्हणून आपल्यावरील भांडवली प्रभुत्वाविरोधात एकत्रितपणे लढा देईन.

स्वतंत्र मजूर पक्षाचा जाहीरनामा ज्या वेळेस प्रकाशित करण्यात आला, त्या वेळेस शेतकरी, शेतमजूर, कामगार वर्ग, गरीब, बेरोजगार यांच्या हिताची काळजी वाहण्याचे कार्यच या पक्षाने अंगीकृत कार्य ठरवले होते (गायकवाड, २००७ : ६) देशातील श्रमजीवी जनतेच्या सामाजिक, आर्थिक व राजकीय हक्काच्या लढ्यासाठी हा पक्ष स्थापन झाला होता. या पक्षाच्या माध्यमातून काही महत्त्वाच्या मागण्या करण्यात आल्या. यामध्ये शेतमजुरांची किमान मजुरी ठरविणे, ओद्योगिक कामगारांना पुरेसा पगार व पगारी सुट्ट्या, कामगार संघटना व प्रतिनिधींना मालकांकडून मान्यता, वर्षातून सलग २४० दिवस ... हंगामी अगर अस्थायी कामगारांना ...

देणे, नोकरीची व अपघाताची मालकाकडून नुकसान भरपाई मिळणे. (बसाखेत्रे र., २०१७ : ५९३) यावरून डॉ. बाबासाहेबांचे कामगारांबाबतचे विचार स्पष्ट होतात. ते म्हणत, आमचा स्वतंत्र मजूर पक्ष हा निर्भेळ वर्गतत्त्वाच्या पायावर उभारलेला आहे. कामगारांमधील जातीय भावना दूर करून वर्गीय पातळीवर सर्वच कष्टकऱ्यांना एकत्र आणणे हे त्यांचे उद्दिष्ट होते. भारतातील सामाजिक वास्तव विचारात घेता जातिबद्ध समाजाला वर्गीय जाणिवेतून एकत्र आणणे अतिशय कठीण होते, याची त्यांना जाणीव होती. इ. स. १९३८ मध्ये मनमाड येथील अस्पृश्य कामगार परिषदेमध्ये त्यांनी भारतातील कामगार चळवळीची दशा आणि दिशा यावर भाष्य केले. ही दलित कामगारांची पहिलीच सभा होती. आपल्या भाषणात त्यांनी काही महत्त्वाच्या मुद्द्यांचा ऊहापोह केला. त्यामध्ये अस्पृश्यांच्या सामाजिक न्यायाच्या लढ्याइतकाच आर्थिक न्यायाचा प्रश्न महत्त्वाचा आहे हे सांगितले. त्यांनी या सभेत सांगितले की, नागरी हक्क आणि समान आर्थिक संधी नाकारणे या ब्राह्मणवादाच्या दोन मुख्य व्यवस्था आहेत. जातीच्या थरानुसारच आर्थिक संधीही विभागल्या गेल्या होत्या. ते उदाहरण देतात, ख्रिचन किंवा अँग्लो इंडियन आणि नॉनमॅट्रिक हिंदू त्या पदावर योग्य मानला जात असे. दलितांना रेल्वे वर्कशॉपमध्ये मेकॅनिक म्हणून स्वीकारले जात नव्हते. डॉ. बाबासाहेब म्हणतात, मार्क्सने सामाजिक समानतेमध्ये वर्ग किंवा जात हा निर्णायक मुद्दा आहे असे कधीही म्हटले नव्हते आणि भारतात जातींनी जशी कामगारांची विभागणी केली होती तशीच युरोपमध्ये राष्ट्रीयत्वाने कामगारांची वर्गवारी केली जात होती. (ओम्वेट, २०२१ : ७७) मार्क्सवाद्यांच्या जातींच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष करण्यामागे मार्क्सवादाच्या तात्त्विक पातळीवरील मूलभूत सैद्धांतिक गृहीतके कारणीभूत होती. यासंदर्भात डॉ. बाबासाहेबांनी जनतामध्ये १९३६ मध्ये जो लेख लिहिला होता, त्यामध्ये मार्क्सवादाच्या मूळ मांडणीवरच हल्ला चढवला होता. त्यांनी ठामपणे प्रतिपादन केले की, कामगारांची शक्ती उभारण्यासाठी त्यांच्यामध्ये असलेली धार्मिक गुलामगिरीची मानसिकता नष्ट केली पाहिजे. २५ जून १९३८ च्या जनतामध्ये ते म्हणतात, कामगारांमधील संघर्षाच्या उभारणीसाठी जातिनिर्मूलन ही पूर्वअट होती. (ओम्वेट, २०२१ : ७९).

औद्योगिक कलहाचे विधेयक १९३८ च्या सप्टेंबर महिन्यात मुंबईच्या विधिमंडळात विचारासाठी मांडले गेले. या विधेयकात विशिष्ट परिस्थितीत कामगारांचा संप बेकायदेशीर ठरवावा, अशी तरतूद होती. कामगारांच्या हक्कांवर गदा आणणारा हा कायदा होता. याला काळा कायदा, असे म्हणून डॉ. बाबासाहेब व जमनालाल मेथा यांनी विरोध केला. या काळ्या कायद्याच्या विरोधात स्वतंत्र मजूर पक्ष आणि गिरणी कामगार युनियन यांनी आपल्या संयुक्त

बैठकीत एक दिवसाचा संप करण्याचा निर्णय घेतला. या संपात ९०% स्वयंसेवक आंबेडकरांच्या स्वतंत्र मजूर पक्षाचे होते. या संपात पोलिसांनी गोळीबार केला त्यात ७२ लोक जखमी झाले. या संपाचे नेतृत्व डॉ. बाबासाहेबांनी केले. या संपानंतर डॉ. बाबासाहेब प्रथम श्रेणीचे कामगार नेते म्हणून जगभर प्रसिद्ध झाले आणि राजकीय, सामाजिक नेतृत्वाएवढेच कामगारांच्या नेतृत्वातही डॉ. बाबासाहेब लढवय्ये, समर्थ प्रभावी नेते म्हणून शासनावर व इतर समाजावर प्रभाव पाडू शकले.

**मजूर मंत्री डॉ. बाबासाहेब** – २० जुलै १९४२ रोजी डॉ. बाबासाहेबांनी मजूर मंत्री म्हणून सूत्रे हाती घेतली. डॉ. बाबासाहेबांनी त्यांच्या कार्यकाळात अनुभवी आणि अर्धशिक्षित तंत्रज्ञांना नोकरीसाठी भटकावयास लागू नये म्हणून सेवायोजन कार्यालयाची स्थापना केली. १० मे १९४३ रोजी 'इंडियन फेडरेशन ऑफ लेबर' या मुंबई शाखेच्या सभेत भाषण करताना डॉ. बाबासाहेब म्हणाले, 'भारतात कामगारांनी कामगार मंत्रिमंडळ स्थापन करण्याचा प्रयत्न करावा. भारतास स्वातंत्र्य मिळणे एवढीच गोष्ट पुरेशी नाही, ते स्वराज्य कोणत्या लोकांच्या हातात पडते याला महत्त्व आहे. (बसाखेत्रे, २०१७ : ५९७ ) जनता पाक्षिकाच्या ९ नोव्हेंबर १९४० च्या अंकात डॉ. बाबासाहेब ७ नोव्हेंबर रोजी रशियन राज्यक्रांती झाली त्यासंदर्भात लिहितात, जगात जर लोकशाही नांदावयाची असेल कामगारशाहीचाच उदय व्हायला हवा. इंग्लंड आणि फ्रान्स या देशात झालेल्या क्रांत्या तेथील राजसत्ता भांडवलदारांच्या हातात गेल्यामुळे फोल ठरल्या. रशियन राज्यक्रांतीने भांडवलशाहीचा बंदोबस्त केला. परंतु तेथील सत्ता कामगार वर्गाच्या हातात आली नाही, ती एका सोटेशाही पक्षाच्या हातात आहे, तोपर्यंत खरी कामगारशाही  निर्माण झाली, असे म्हणता येणार नाही. (गायकवाड, २००७ : ८४) डॉ. बाबासाहेब मजूर मंत्री असताना त्यांनी कामगार कायद्यात काही सुधारणा घडवून आणल्या. यामध्ये स्त्रियांना कारखाना कायद्यान्वये रात्री काम करण्याची बंदी घातली, स्त्रियांना प्रसूती काळात विशेष भरपगारी रजा मिळावी म्हणून प्रयत्न केले, त्यांनी कामगार कायद्यात महत्त्वाची सुधारणा केली, ती म्हणजे कारखान्यातील बारमाही कामगारांना भरपगारी रजा द्यावी. यापूर्वी कामगारांना कोणत्याच रजेचे फायदे मिळत नव्हते. डॉ. बाबासाहेबांनी कामगारांना वाढत्या महागाईच्या निर्देशांकाच्या आधारावर महागाई भत्याची पूर्तता व्हावी यासाठी प्रयत्न केले. डॉ. बाबासाहेबांनी मध्यवर्ती शासनाचे जे कामगार कायदे होते ते कामगारांना जाचक होते, यासाठी पुढाकार घेऊन विधिमंडळात कामगार हितासाठी कामगार कायद्यात सुधारणा घडवून आणल्या. जगात नव्या युगाला सुरुवात करावयाची असल्यास लोकशाही

राष्ट्रांना आपले भांडवलशाही धोरण सोडून द्यायला पाहिजे तसेच साम्यवादी राष्ट्रांनी आपले सोटेशाहीचे धोरण सोडले पाहिजे तरच नव्या युगाची सुरुवात होईल.


संदर्भ

१) ओम्वेट, ग. (२०२१ : ७७ ). आंबेडकर प्रबुद्ध भारताच्या दिशेने, पुणे : मधुश्री पब्लिकेशन.

२) गायकवाड, प. (संपा.). (२००७ : ६). कामगार चळवळ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची निवडक भाषणे व लेख (तिसरी आ.). नागपूर, महाराष्ट्र : क्षितिज पब्लिकेशन.

३) डोळस, अ. (संपा.). (२०१८: ५). Dr. Babasaheb ambedkar source Material (FirstAm.,भाग खंड ३-१ ). Mumbai , Maharashtra: Higher and Technical Dept. Maharashtra Govt.

४) बगाडे, उ., (२०२० : ३६). डॉ आंबेडकरांची जातिमीमांसा (२ आ.). मुंबई : लोकवाङ्मय गृह.

५) बसाखेत्रे, र. (२०१७ : ५९३). डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे कामगारविषयक धोरण. (द. पवार, संपा.) पुणे : महाराष्ट्र साहित्य आणि संस्कृती मंडळ.

६) बिपीन, च. (२००४ : ४५). भारत में आर्थिक राष्ट्रवाद का उद्भव और विकास. दिल्ली : राजकमल प्रकाशन.